पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड-३३
क्र./बप्र२/कावि/२४४/२०१२,
दिनांक :२८/९/२०१२.

प्रति,
मा. श्री/श्रीमती --------------------------
सदस्य/सदस्या, प्रभाग क्र.----------------
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११ ०१८.

**विषय : ब प्रभाग समितीची मासिक सभा दि.१०/१०/२०१२ रोजी आयोजित केलेबाबत.**

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक १०/१०/२०१२ रोजी दु. १२.०० वाजता ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली आहे. या पत्रासोबत सभेची कार्यपत्रिका पाठविण्यात येत आहे. तरी प्रस्तुत सभेस उपस्थित रहावे, हि विनंती

कळावे,

आपला विश्वासू

प्रशासन अधिकारी, सभा शाखा,
ब प्रभाग समिती
चिंचवड ४११ ०३३.

प्रत : सर्व संबंधित शाखा प्रमुख

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
ब प्रभाग समिति
कार्यपत्रिका क्र. ५

दिनांक १०/१०/२०१२ वेळ : दु. १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि. १०/१०/२०१२ रोजी दु. १२.०० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित केली आहे. सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

मागील सभेचा सभावृत्तांत (माहे सप्टेबर २०१२) वाचून कायम करणे तसेच ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणे व त्यावर चर्चा करणे.

विषय क्र.१ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

पिंपरी येथील पवना नदीवरील घाटास अर्धवर्तुळाकार घाट बनविणेबाबत.

पिंपरीनगर, सुभाषनगर येथील घाटावर दरवर्षी सिंधी समाजाचा चालिया उत्सव साजरा केला जातो. सदर उत्सव हा ४० दिवसांचा असतो.

हा उत्सव पर्जन्य देवतेचा आहे. त्यामुळे घाटावर संपूर्ण समाज एकत्र येवून पुजा करतात. सदर ठिकाणी मोठया प्रमाणावर गर्दी होत असते. सांडपाण्यामुळे घाट प्रदुषित होतो. भाविक नदीचे पाणी पितात, म्हणून या सुभाषनगर घाटावर वर्तुळाकार घाट बनविण्यात यावा.

विषय क्र.२ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

पिंपरीनगर येथील पवना नदीवरील घाटास झुलेलाल असे नामकरण देण्यास मंजुरी देण्यात यावी.

प्रशासन अधिकारी,(सभाशाखा)
ब प्रभाग समिती
चिंचवड ४११ ०३३

सर्व संबंधित शाखा प्रमुख.